जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत
30 NOV 2024

# आय विटनेस रोषणाईने उजळला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा.....



शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरणास उद्या रविवारी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने या सुवर्णमहोत्सवी पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे.

30 NOV 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर:** शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरणास एक डिसेंबर २०२४ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याचा सुवर्णमहोत्सव दिन शनिवारी विद्यापीठ साजरा करणार आहे. त्याच्या पूर्वसंध्येला शुक्रवारी या सुवर्णमहोत्सवी पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
तरूण भारत



## उजळला शिवाजी विद्यापीठ परिसर...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा अनावरणास रविवारी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त पुतळ्याभोवती केलेल्या आकर्षक विद्युत रोषणाईने परिसर उजळून निघाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 NOV 2024
सिंधुदुर्ग समाचार



शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरणास येत्या १ डिसेंबर २०२४ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने या सुवर्णमहोत्सवी पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याचे छायाचित्र टिपले आहे शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी.

30 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासाची सदैव साक्ष देणारा शिवाजी विद्यापीठातील छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा

## उद्या सुवर्ण महोत्सव; शिल्पकार बी. आर. खेडकर यांची अजरामर कलाकृती

कोल्हापूर : प्रवीण मस्के

शिवरायांचे आठवावे रूप । शिवरायांचा आठवावा प्रताप । शिवरायांचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।... या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य कार्याची महती सांगणाऱ्या पंक्तीप्रमाणेच गेल्या ५० वर्षांपासून शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ ब्राँझ पुतळा ऊन, वारा, पावसात दिमाखदारपणे इतिहासाची साक्ष देत आहे.

विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोर दिमाखदार उभे असलेल्या या पुतळ्यास १ डिसेंबर २०२४ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. इतका दुर्मीळ शिल्प झालेले व ५०० फूट लांबून पुतळे उभारणारे पुण्यातील शिल्पकार बी. आर. खेडकर यांनी हा पुतळा साकारला. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या इच्छेनुसार १९७० ला शिवरायांचा भव्य पुतळा साडेअठरा फूट उंचीचा करून पाहिजे, अशी दैनिकात जाहिरात दिली. त्याचे मॉडेल व कोटेशन मागवले.

खेडकर यांचेच मॉडेल समितीला पसंत पडले. खेडकर यांनी विद्यापीठाच्या प्रांगणात त्यावेळेले साडेअठरा फूट उंचीचे कटआउट पाहून कुलगुरू पवार यांनी असाच पुतळा व्हायला हवा, असे सांगितले. खेडकर यांनी घोड्याचे मॉडेल करण्याकरिता बाराबुरा घोडा स्टुडिओमध्ये आणला होता. १९७१ ला सुरू झालेले पुतळ्याचे काम तीन वर्षांनी पूर्ण झाले. १ डिसेंबर १९७४ रोजी तत्कालीन परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण व मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले.

**पुतळ्याविषयी...**

- अनावरण : १ डिसेंबर १९७४
- आशिया खंडातील सर्वांत मोठा पुतळा
- चौथऱ्यासह पुतळ्याची उंची : ३६ फूट ६ इंच
- पुतळ्याची उंची : १८ फूट ६ इंच
- पुतळ्याची लांबी : २० फूट
- वजन : ८ टन (संपूर्ण ब्राँझमधील वजन)

### लोकसहभागातून उभारला पुतळा

हा पुतळा उभारणीसाठी भोगावती, दूधगंगा-वेदगंगा, कुंभी-कासारी, वारणा व पंचगंगा या सहकारी साखर कारखान्यांनी प्रत्येकी ६० हजार रुपये दिले; तर विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि नागरिकांनी ६६ हजार ५९० असे मिळून ३ लाख ६६ हजार रुपये आर्थिक मदत केली. लोकसहभागातूनच छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा उभारला आहे.

हा पुतळा हे कोल्हापूरचेच नव्हे तर देशाचे वैभव आहे. पुतळा उभारणीच्या सुवर्णमहोत्सवी क्षण साजरा करीत असताना अभिमान वाटत आहे. पुतळ्याच्या प्रेरणेने व साक्षीने विद्यार्थ्यांच्या पिढ्या घडल्या. पुढील पिढ्यांसाठी हा पुतळा स्फूर्ती देत राहील.

- डॉ. डी. टी. शिर्के,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

५० वर्षे होऊनसुद्धा हा पुतळा दिमाखदार उभा आहे. हे आजकालच्या तरुण शिल्पकारांना आदर्श आहे. आप्पासाहेबांनी दाखवून दिले आणि हेच शिकवण घेऊन मी त्यांच्या कलेचा वारसा पुढे घेऊन जात आहे.

- श्रीधर खेडकर, शिल्पकार, पुणे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरणास १ डिसेंबर रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने सुवर्णमहोत्सवी पुतळ्यास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. (छाया : नाज ट्रेनर)

30 NOV 2024 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवरायांच्या पुतळ्यास सुवर्ण झळाळी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या अनावरणास येत्या १ डिसेंबर २०२४ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने या सुवर्णमहोत्सवी पुतळ्यास आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
लोकमत

# शिवरायांच्या पुतळ्याचा आज सुवर्णमहोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला उद्या रविवारी (दि.१) ५० वर्षे पूर्ण होत असून, यानिमित्ताने विद्यापीठाच्या वतीने आज शनिवारी पुतळा अनावरण सुवर्णमहोत्सव दिन साजरा करण्यात येणार आहे. या पुतळ्याचे शिल्पकार स्व. बी.आर. खेडकर यांच्या कन्या शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के व त्यांचे कुटुंबीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात सायंकाळी ४ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी खेडकर कुटुंबीयांचा विद्यापीठाच्या वतीने सत्कार करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
लोकमत

# लोकांच्या प्रेम, आदरास पात्र ठरल्यानेच संविधान यशस्वी


## डॉ. अशोक चौसाळकर : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : संविधान ही भारतीय लोकांनी आपल्या जीवनाची प्रेरणाशक्ती मानली. हे संविधान लोकांच्या प्रेमादरास पात्र ठरल्यानेच गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आणि यापुढेही टिकेल, असा विश्वास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात आयोजित 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार अध्यक्षस्थानी होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, संविधानातील विचार हे देशातील जनतेला मान्य असल्यानेच त्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला, हे लक्षात घेतले पाहिजे. संविधानाचे



शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी मार्गदर्शन केले.

तत्त्वज्ञान हे सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींतून साकार झाले आहे. लोकमान्य टिळकांपासून महात्मा गांधी यांच्यापर्यंत भारतीय स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान अभिव्यक्त झाले. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सामाजिक चळवळींचे तत्त्वज्ञान आकारास आले. या साऱ्या चळवळींचे तत्त्वज्ञान संविधानामध्ये ग्रंथित झाल्याचे दिसते. मार्गदर्शक तत्त्वांमधील अनेक तरतुदी या देशाच्या गेल्या दीडशे वर्षांच्या सुधारणांची परंपरा सांगणाऱ्या आहेत.

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, राज्यघटनेने भारतीय नागरिकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. तिने लोकांना सामाजिक गुलामगिरीकडून मुक्त वातावरणात आणले आहे. देशातील समग्र सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक परिस्थिती पालटण्यासाठी राज्यघटनेने बळ दिलेले आहे. डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. मतीन शेख यांनी आभार मानले.

30 NOV 2024


सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरच, राज्यघटना खऱ्या अर्थाने देशाचे आत्मचरित्र ठरेल

## डॉ. अशोक चौसाळकर : शिवाजी विद्यापीठातील संविधान सप्ताहाचा आज समारोप

कोल्हापूर, ता. २९ : 'राज्यघटनेतील तरतुदींचा प्रत्यक्ष लाभ लोकांना व्हायला हवेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेतल्या अखेरच्या भाषणात आपण मागास समाजासाठी प्रागतिक राज्यघटना देत असल्याचे सांगून हा अंतर्विरोध लवकर कमी करण्याविषयी सूचित केले होते. तसे करण्यात आपण यशस्वी ठरलो तरच भारतीय राज्यघटना खऱ्या अर्थाने देशाचे आत्मचरित्र ठरेल', असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी आज येथे केले.



डॉ. अशोक चौसाळकर

शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, 'संविधानातील विचार हे देशातील जनतेला मान्य असल्यानेच त्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला. संविधानाचे तत्त्वज्ञान हे सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींतून साकार झाले आहे. संविधान ही भारतीय लोकांनी आपल्या जीवनाची प्रेरणाशक्ती मानली.

हे संविधान लोकांच्या प्रेमादरास पात्र ठरल्यानेच गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आणि यापुढेही टिकेल.'

डॉ. पवार म्हणाले, 'राज्यघटनेने भारतीय नागरिकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. तिने लोकांना सामाजिक गुलामगिरीकडून मुक्त वातावरणात आणले आहे. देशातील समग्र सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक परिस्थिती पालटण्यासाठी राज्यघटनेने बळ दिले आहे.'

यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, तानाजी चौगुले, चंद्रकांत लंगरे, रवींद्र भणगे, प्रकाश कांबळे, विलास सोयम, सुखदेव उंदरे उपस्थित होते. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. मतीन शेख यांनी आभार मानले. दरम्यान, संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचा समारोप समारंभ उद्या, शनिवारी पुणे येथील डॉ. रविनंद होवाळ यांच्या व्याख्यानाने होणार आहे.


30 NOV 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकांच्या प्रेम, आदरास पात्र ठरल्यानेच संविधान यशस्वी

■ डॉ. अशोक चौसाळकर



कोल्हापूर : संविधान ही भारतीय लोकांनी आपल्या जीवनाची प्रेरणाशक्ती मानली. हे संविधान लोकांच्या प्रेम, आदरास पात्र ठरल्यानेच गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आणि यापुढेही टिकेल, असा विश्वास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव सप्ताहामध्ये 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, संविधानातील विचार हे देशातील जनतेला मान्य असल्यानेच त्यांचा समावेश राज्य घटनेत करण्यात आला, हे लक्षात घेतले पाहिजे. संविधानाचे तत्त्वज्ञान हे सामाजिक, आर्थिक व राजकीय चळवळींतून साकार झाले आहे. लोकमान्य टिळकांपासून महात्मा गांधी यांच्यापर्यंत भारतीय स्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान अभिव्यक्त झाले. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत सामाजिक चळवळींचे तत्त्वज्ञान आकारास आले. या साऱ्या चळवळींचे तत्त्वज्ञान संविधानामध्ये ग्रंथीत झाल्याचे दिसते. अध्यक्षीय मनोगतात डॉ. प्रकाश पवार म्हणाले, राज्यघटनेने भारतीय नागरिकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. तिने लोकांना सामाजिक गुलामगिरीकडून मुक्त वातावरणात आणले आहे.

प्रास्ताविक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले, तर मतीन शेख यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश कांबळे, विलास सोयम आदी उपस्थित होते.

## सप्ताहाचा आज समारोप

शिवाजी विद्यापीठाच्या भारतीय संविधान अमृत महोत्सव सप्ताहाचा समारोप समारंभ शनिवारी होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील डॉ. रविनंद होवाळ हे उपस्थित राहणार असून, 'भारतीय संवैधानिक मूल्ये' या विषयावर विशेष व्याख्यान देतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

30 NOV 2024
पुढारी

# लोकांच्या प्रेमास पात्र ठरल्यानेच भारतीय संविधान यशस्वी

## डॉ. अशोक चौसाळकर यांचे प्रतिपादन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

संविधान ही भारतीय लोकांनी जीवनाची प्रेरणाशक्ती मानली. हे संविधान लोकांच्या प्रेमास पात्र ठरल्यानेच गेली ७५ वर्षे यशस्वीपणे टिकले आणि यापुढेही टिकेल, असा विश्वास ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात आयोजित भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'भारतीय संविधानाचे आजच्या भारतासाठीचे महत्त्व' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार होते. डॉ. चौसाळकर म्हणाले, संविधानातील विचार हे देशातील जनतेला मान्य असल्यानेच त्यांचा समावेश राज्यघटनेत करण्यात आला आहे. संघर्ष, चळवळींशिवाय आणि मागण्या मांडल्याखेरीज अधिकार प्राप्त होत नाहीत, हे अनेक वर्षांच्या संवैधानिक वाटचालीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे जीवनात राज्यघटनेचे महत्त्व आहे; पण जेव्हा लोक आपले अधिकार शाबीत करून घेतात, तेव्हा ते सिद्ध होते.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. पवार म्हणाले, राज्यघटनेने भारतीय नागरिकांच्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. देशातील समग्र सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक परिस्थिती पालटण्यासाठी राज्यघटनेने बळ दिले आहे. डॉ. प्रल्हाद माने यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. मतीन शेख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. चंद्रकांत लंगरे, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. प्रकाश कांबळे, विलास सोयम आदी उपस्थित होते.

### भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचा आज समारोप

शिवाजी विद्यापीठाच्या भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहाचा समारोप समारंभ शनिवारी (दि. ३०) होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील डॉ. रविनंद होवाळ उपस्थित राहणार आहेत. मभारतीय संवैधानिक मूल्येफया विषयावर ते विशेष व्याख्यान देतील.

30 NOV 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुदृढ लोकशाहीसाठी सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभारण्याची गरज

## डॉ. सुरेंद्र जोंधळे; भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताह

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

भारतीय लोकशाहीचा अवकाश घटनात्मक ते प्रातिनिधिक आणि पुढे प्रातिनिधिक ते मतदानकेंद्री असा आक्रसत गेला. लोकशाहीचे पुन:श्च सुदृढ लोकशाहीत रुपांतर करण्यासाठी सत्यान्वेषी राजकारण नव्याने उभाण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ. सुरेंद्र जोंधळे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठात भारतीय संविधान अमृतमहोत्सव सप्ताहामध्ये 'संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, समता आणि धर्मनिरपेक्षता' विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाश पवार होते.

डॉ. जोंधळे म्हणाले, गेल्या ७५ वर्षांत सवंग लोकप्रिय राजकारण घडविण्यात आले. त्यातून लोकांच्या सार्वजनिक जीवनाचे अवमूल्यन झाले. देशाप्रती कर्तव्याची भावना विरळ होत गेली. अशा सामाजिक उणीवा दूर करण्यासाठी कटिबद्ध होण्याची गरज आहे.

डॉ. पवार म्हणाले, धर्मनिरपेक्षता ही संकल्पना भारतीय संविधानाने पाश्चात्त्यांकडून नव्हे तर भारतीयांची गरज म्हणून स्वीकारली. देशातील नागरिकांचे व्यक्तीगत आणि सार्वजनिक जीवन कलुषित करणारे विपर्यस्त संप्रेषण रोखणे आपल्यासमोरील आव्हान आहे.

नेहरू अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. प्रल्हाद माने यांनी स्वागत केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी परिचय करून दिला. अविनाश भाले यांनी सूत्रसंचालन केले. मतीन शेख यांनी आभार मानले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. नितीन माळी, डॉ. चंद्रकांत लंगरे, विलास सोयम, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. तेजपाल मोहरेकर उपस्थित होते.

## 'संविधान साक्षरता' विषयावर गटचर्चा

संविधानामुळे भारतीय नागरिकांच्या जीवनात आमुलाग्र परिवर्तन झाले आहे, असा सूर संविधान साक्षरता विषयावरील गटचर्चेत उमटला. डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. प्रकाश पवार, डॉ. किशोर खिलारे आदींनी सहभाग नोंदविला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ३०) सकाळी ११.३० वाजता भारतीय संविधान अमृतमहोत्सवांतर्गत विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या विशेष व्याख्यानात डॉ. रविनंद होवाळ हे 'भारतीय संविधानिक मूल्ये' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षेला ६१ हजार १३९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या २०५ विषयांची ६१ हजार १३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांतील १८९ केंद्रांवर शुक्रवारी बीए, बीकॉम बीएस्सी, बीडीएस, बीई, बीटेक, बीकॉम (आयटी), बीव्होकसह विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. कोल्हापूर ३२, सांगलीत ९ व साताऱ्यात ६ अशा तीन जिल्ह्यांतून ४७ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
तरुण भारत

# चौगुले महाविद्यालयाच्या तांबवेकरची भालाफेक स्पर्धेसाठी निवड

कोलोली : शिवाजी विद्यापीठमध्ये झालेल्या कोल्हापूर विभागीय मैदानी स्पर्धेत श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी–कोतोली येथील विवेक शिवाजी तांबवेकर याने भालाफेक प्रकारात द्वितीय क्रमांक (रौप्य पदक) पटकावला. त्याची आंतरविभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच आकाश ब्रह्मदेव गुरव याने ४०० मीटर धावणेत तृतीय क्रमांक (कांस्य पदक) पटकावला. यांना संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले, संस्थेचे सचिव शिवाजीराव पाटील, प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील व जिमखाना विभागप्रमुख शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संग्रामसिंह मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.



विवेक तांबवेकर, प्रा. संग्रामसिंह मोरे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2024
सकाळ




कोल्हपूर : गुंटूर (आंध्र प्रदेश) येथील आचार्य नागार्जुन विद्यापीठात झालेल्या दक्षिण-पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघासोबत मान्यवर उपस्थित होते.

# वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ विजेते

## आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : गुंटूर (आंध्र प्रदेश) येथील आचार्य नागार्जुन विद्यापीठात झालेल्या दक्षिण-पश्चिम आंतर विद्यापीठीय विभागीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या संघाने प्रत्येकी एक सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदकाची कमाई केली.

सर्वसाधारण विजेतेपद पटकावलेल्या शिवाजी विद्यापीठांच्या महिला संघाची या कामगिरीवर हिमाचल प्रदेशातील सेंट्रल युनिव्हर्सिटीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी झालेल्या खेळाडूंमध्ये काजल सरगर (सुवर्ण), भूमिका मोहिते (रौप्य), निकिता कमलाकर (कांस्य), राजनंदिनी आमणे, प्राजक्ता साळुंखे, साक्षी सांदुगडे, अपेक्षा ढोणे, राजलक्ष्मी पवार, स्नेहा आमणे यांचा समावेश आहे.

खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. सी. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक डॉ. प्रशांत पाटील, डॉ. रवींद्र चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

30 NOV 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघास सर्वसाधारण विजेतपद

## साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी महिला वेटलिफ्टिंग स्पर्धा

**कोल्हापूर :** साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ महिला संघाने सर्वसाधारण विजेतपद पटकावले. विद्यापीठाच्या संघाने स्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्य व एका कांस्यपदकाची कमाई केली. आचार्य नागार्जुन युनिव्हर्सिटी गुंटूर आंध्र प्रदेश येथे ही स्पर्धा झाली.

या खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. सी. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रशिक्षक डॉ. प्रशांत पाटील व डॉ. रवींद्र चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंमध्ये काजल सरगर (सुवर्ण), भूमिका मोहिते (रौप्य), निकिता कमलाकर (कांस्य), सरिता सावंत व राजनंदिनी आमणे (चतुर्थ), प्राजक्ता साळुंखे (पाचवी), साक्षी संदुगडे (सातवी), अपेक्षा ढोणे (आठवी), राजलक्ष्मी पवार (बारावी), स्नेहा आमणे (चौदावी) यांचा समावेश आहे. या खेळाडूंची निवड अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी झाली.



आंध्र प्रदेश : साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत सर्वसाधारण विजेतपद पटकावलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.